स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रचारादरम्यान वापरावयाच्या वाहन संख्येबाबत..

## राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/जिपपस-२०१६/प्र.क्र. ३१/का-७,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १९ नोव्हेंबर, २०१६.

## आदेश

राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ/मनपा-२००६/प्र.क्र.१९/का.५, दि. ११ ऑगस्ट, २००६ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्यावेळी प्रचारफेरी किंवा प्रचारासाठी मिरवणुकांच्यावेळी वापरण्यात येणाऱ्या वाहनांची संख्या महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हापरिषदा व पंचायत समिती निवडणुकांसाठी ३, तर ग्रामपंचायत निवडणुकीसाठी १ करण्यात आली आहे.

२. राज्य निवडणूक आयोगाकडुन आयोजित करण्यात आलेल्या पोलीस व इतर विभागांच्या माहे ऑक्टोबर, २०१६ मधील कार्यशाळेतील चर्चेच्या अनुषंगाने उपरोक्त आदेशात सुस्पष्टता आणण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे सुधारणा करणे आवश्यक झाले आहे. तरी उपरोक्त आदेश अधिक्रमीत करण्यात येत असून पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

i) निवडणूक आचारसंहिता कालावधीत प्रचार फेरी किंवा प्रचार मिरवणुकीत वापरण्यात येणाऱ्या वाहनांची संख्या महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हापरिषद व पंचायत समिती निवडणुकीत जास्तीत जास्त १० राहील. (यामध्ये जास्तीत जास्त ३ वाहने चारचाकी, वा तीनचाकी असतील व इतर वाहने दुचाकी असू शकतील.) तर ग्रामपंचायत निवडणुकीत सदर मर्यादा ही जास्तीत जास्त ३ राहील. (१ वाहन तीन वा चार चाकी व इतर वाहने दुचाकी असू शकतील)

ii) उपरोक्त मर्यादेमध्ये एखाद्या मंत्री वा अन्य प्रचारकाला पुरविण्यात आलेल्या सुरक्षितेसाठीच्या वाहनांचा समावेश होणार नाही. परंतु त्या वाहनांद्वारे प्रचार (फलक / झेंडे वा ध्वनीक्षेपकाद्वारे प्रचार करणे) करता येणार नाही.

iii) प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांची पूर्वपरवानगी संबंधित जिल्हाधिकारी / निर्वाचक अधिकारी पोलीस यांचेकडून घेणे आवश्यक राहील. सदर मर्यादेपेक्षा जास्त वाहने वापरणे व परवानगी नसणाऱ्या वाहनांद्वारे प्रचार करणे या दोन्ही गोष्टी निवडणुकांमधील गैरप्रकार मानण्यात येईल. तसेच त्याचा खर्चही प्रचार फेरीच्या खर्चात समाविष्ट करण्यात येईल. त्यासाठी संबंधित उमेदवार वा संबंधित पक्ष (पक्षाची प्रचार फेरी वा मिरवणूक असल्यास) यांच्यावर भारतीय दंड संहितांअंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

iv) संबंधित यंत्रणेने दिलेली परवानगी ही वाहनाच्या दर्शनीभागी लावणे आवश्यक राहील.

v) प्रचारासाठी वापरण्यात येणारी वाहने ही एकाच उमेदवाराच्या प्रचारासाठी असल्यास त्यासाठीचा खर्च हा उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट होईल. जर सदरचा प्रचार हा पक्षातर्फे वा आघाडीतर्फे करण्यात येत असेल तर सदरची प्रचार फेरी / मिरवणूक ही ज्या प्रभागातून / निवडणूक विभाग / निर्वाचक गणाच्या हद्दीतून जाईल त्या सर्व प्रभागांमधील त्या पक्षाच्या किंवा आघाडीच्या उमेदवारांमध्ये तो खर्च समप्रमाणात विभागून दाखविण्यात येईल.

(एस.एम. चन्द्रे)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व महानगरपालिका आयुक्त
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
निवड नस्ती

D:\वाहनांची संख्या.doc